I J R S S I S,Issue (VIII), Vol. II, Jan 2023 : 533-539
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# १६ ऑगस्ट १९४२ च्या चिमूर क्रांती दरम्यान ब्रिटिशांचाअत्याचार, दिलेल्या शिक्षा व क्रांतीवीरांची मुक्तता

कैलास रामचंद्र भांडारकर
इतिहास विभाग,शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली जि.गडचिरोली
*Corresponding Author :- kailasbhandarkar70@gmail.com

Communicated : 02.01.2023 | Revision :08.01.2023 Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023

**सारांश :–**
ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून भारताला मुक्त करण्यासाठी भारतीयांनी ब्रिटिश विरोधात अनेक आंदोलने केली. त्यापैकी १६ ऑगस्ट १९४२ चे चले जाव आंदोलना संदर्भात चिमूर क्रांती भारतातच नव्हे तर जग प्रसिध्द बाहे. ८ ऑगस्ट १९४२ च्या मुंबई येथील गवालीया टॅंक मैदानावर महात्मा गांधींनी आपल्या भाषणातून चले जाव आंदोलनाचा दिलेला नारा व 'करा अथवा मरा' विधानाने भारतीयांची मने पेटून उठली. याचे पडसाद चंद्रपूर जिल्हयातील चिमूर येथे उमटल्यावाचून राहिली नाही. चंद्रपूर येथे या आंदोलनाला प्रतिसाद मिळताच ब्रिटिश सरकारने चंद्रपूरच्या जेष्ठ नेत्यांना अटक केली. त्याच्या निषेधार्थ चिमूरला १६ ऑगस्ट १९४२ रोजी मोर्चा काढण्यात आला. त्यावर पोलीसांनी गोळीबार केला.त्यात चिमूरचे तीन क्रांतीकारक शहीद झाले. त्यामुळे संतप्त जमावाने विश्रामगृहाला आग लावली. त्या आगीत दोन ब्रिटिश महसूल अधिकारी भस्मसात झाले. याच जमावाने सर्कल इन्स्पेक्टर व हेडकॉन्सटेबल या पोलीस अधिका-याना ठार मारले. याची वार्ता चंद्रपूरच्या कलेक्टरला लागताच त्यानी चिमूरला पोलीस फोर्स व लष्कर पाठविले. या लष्कराने चिमूरची लूट करून हजारो स्त्रि-पुरूषांना तुरूंगात डांबले त्यानंतर स्त्रियांवर अत्याचार व बलात्कार केले. अशावेळी न डगमगता दादीबाई बेगडे व प्रभावती घरोटे या हिम्मतवान महिलांनी अनेक स्त्रियांना आश्रय देऊन रक्षण केले. तसेच घडलेल्या प्रकाराची माहिती जिल्हाधिका-याला दिली. तरीही देखील ब्रिटिश सरकारने चिमूरकरांवर खटले भरून फाशीच्या, जन्मठेपेच्या व सश्रम कारावासाच्या आणि स्थानबद्वतेच्या शिक्षा दिल्या.

चिमूर क्रांतीसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना जबाबदार धरून त्याना चंद्रपुरला अटक करून जेल मध्ये ठेवले. चिमूर व आष्टी येथील क्रांतीकारकांना झालेल्या शिक्षा व स्त्रियांवर झालेले अत्याचाराच्या चौकशीसाठी मध्यप्रांतातील अनेक कॉग्रेस पुढा-यानी प्रयत्न केले. तेंव्हा कुठे चिमूर मधील स्त्रियांवरील अत्याचार व बलात्काराची चौकशी करण्याची परवानगी मिळाली. त्यानुसार नागपूरच्या तीन भगिनींनी डॉ. वझलवार यांच्या मदतीने बलात्कारी स्त्रियांची तपासणी करून त्यांच्या मुलाखती व जबानी घेतल्या त्यात अनेक तरूण, गर्भवती व वृध्द स्त्रियांवर बलात्कार झाल्याचे सिध्द झाले.

चिमूरवासियांवर झालेला अत्याचार व शिक्षा बाबत प्रा. भन्साळी यांनी पत्रक काढले त्यावर सरकारने बंदी घातली व प्रा. भन्साळीना अटक केली. तेंव्हा त्यांनी तुरूंगातच आमरण उपोषण सुरू केले. शेवटी डॉ. खरे यांनी गव्हर्नर व भन्साळी यांत तडजोड घडवून आणली नंतर भन्साळीनी उपोषण सोडले.

फाशीची शिक्षा झालेल्या क्रांतीवीरांना कायदेशीर मदत करण्यासाठी डॉ. खरेंच्या अध्यक्षतेखाली फाशी निवारण समिति गठीत करण्यात आली. तर समितीच्या अध्यक्षा सौ.अनसूयाबाई काळे यांना करण्यात आले. या समितीने कोर्टात खटले चालविण्यासाठी निधी गोळा करून खटले चालविले. शेवटी १९ ऑगस्ट १९४५ पर्यंत गव्हर्नरने सर्वांच्या फाशीच्या शिक्षा रद्द केल्या. परिणामी चिमूर व पर्यायाने चंद्रपूर जिल्हयातील जनता आनंदित झाली.

**बिजशब्द :** चिमूर क्रांती, क्रांतीकारक, ब्रिटिश अत्याचार, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, बलात्कार, डॉ. मुंजे, डॉ. खरे, प्रा. भन्साळी, फाशी इत्यादी.

**प्रस्तावना :**

१९४२ ची 'भारत छोडो चळवळ' भारतीय स्वातंत्र्य लढयाची अंतिम लढाई होती. या लढयात म. गांधीनी जाहीर केलेले मंत्र म्हणजे 'करा अथवा मरा' होय या मंत्राने प्रेरित झालेल्या सर्वसामान्य जनतेने जोमाने लढयात भाग घेतला.[१] या लढयाची

कल्पना महात्मा गांधींनी सेवाग्राम मधून घेतली पुढे यालाच 'वर्धा ठराव' या नावाने ओळखल्या जाऊ लागले. ७ ऑगस्ट १९४२ च्या मुंबई येथील गवालीया टॅंक मैदानावर भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनात रात्री ठिक १०.०० वाजता 'भारत छोडो' चळवळीचा ठराव बहूमताने पास झाला.[२] या अधिवेशनाला चिमूरचे कॉंग्रेस कार्यकर्त्ये उध्वराव कोरेकार उपस्थित होते.[३] या अधिवेशनात म. गांधीनी दोन तास भाषण दिले व एक मंत्र दिला तो म्हणजे 'डू ऑर डॉय' परिणामी त्यांच्या भाषणाने व मंत्रांनी भारतीयांची मने भडकली व ते ब्रिटिश विरोधी पेटून उठले.[४] ब्रिटिश सरकारने हि चळवळ दडपण्यासाठी आक्रमक पावले उचलून म. गांधीसह अनेक पुढारी व कॉंग्रेस कार्यकर्त्यांना अटक केली. त्यामुळे चळवळ कमजोर होईल असा ब्रिटिश सरकारचा माणस होता पण झाले उलटेच हे आंदोलन जनतेचे झाले व प्रत्यक माणूस स्वयंभू पूढारी झाला.[५] मुंबई प्रांताच्या जवळ व-हाड व मध्यप्रांत असल्याने तसेच म. गांधींच्या सेवाग्राम येथील वास्तव्यामुळे मध्यप्रांत मुंबईशी जोडल्या गेल्याने 'चले जाव' आंदोलनाचे पडसाद मध्यप्रांतात मोडणा-या चंद्रपूर जिल्हयातील चिमूर मध्ये उमटले. १६ ऑगस्ट १९४२ ची **'चिमूर क्रांती'**भारतातच नव्हे तर जग प्रसिध्द आहे. ९ ऑगस्टला भारतात 'चले जाव आंदोलनाला' सुरवात होताच ११ ऑगस्ट पासून चिमूर मधील तरूण मंडळींनी प्रभात फे-या व जाहिर सभांनी ब्रिटिश सरकारचा प्रतिकार करण्यास सुरवात केली.[७]एकंदरित चिमूरकर व ब्रिटिश सरकार यांच्यात लढयाला सुरवात झालेली असतांनाच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज १३ ऑगस्टला चंद्रपूर वरून चिमूरला आले. त्याच्याभाषणाने व 'अब काहे को धुम मचाते हो' या भजनाने चिमूरकर क्रांतीसाठी अधिक प्रोत्साहित झाले.[८] चिमूर येथील रामचंद्र कामडी, गोपाळराव कोरेकार, उध्वराव कोरेकार, बाबू बांगडे, रामकृष्ण खेमस्कर, कल्याणजी नाईक, अन्नाजी सिरास, सिताराम पोटदुखे, पांडूरंग पोतद्यार, माधवराव सोणार, बालाजी रायपूरे, बाबूलाल झीरे, श्रीराम बिंगेवार व तुमपल्लीवार ईत्यादिनी अन्यायी ब्रिटिश सरकार विरोधात 'चले जाव आंदोलन' चालविले. या आंदोलनात आंदोलनकर्त्यांनी चिमूर मध्ये असलेल्या ब्रिटिश डागबंगल्याच्या दगडे मारूण काचा फोडल्या, याच डागबंगल्यात थांबलेल्या ब्रिटिश अधिकारी सबडिव्हीजन ऑफिसर डुंगाजी व नायब तहसिलदार सोनवणे याना लाठयानी मारले तसेच डागबंगल्याला आग लावली त्या आगीत वरील अधिका-यांचे प्रेते जाळली. पुढे ब्रिटिश सर्कल इन्सपेक्टर जरासंधचा वध केला व कांताप्रसाद या पोलीसाला यमसदनी पाठविले. आणि परतीच्या प्रवासात पोलीस ठाणे, पोलीस कॉटर्स, पोष्ट ऑफिस ईत्यादि सरकारी ईमारतीना आग लावली. मात्र या क्रांतीत चिमूरच्या कॉंग्रेस कार्यकर्त्या पैकी बालाजी रायपूरे, बाबूलाल झीरे व श्रीराम बिंगेवार शहिद झाले.[९ अ.ब.क.]

**चिमूरकरांची ब्रिटिश लष्कराचा प्रतिकाराची तयारी:–**

१६ ऑगस्टला सायंकाळी क्रांतीचा ध्वनी विसावला. पण १७ ऑगस्टला ब्रिटिश लष्कर चिमूरला येणार याची चाहूल चिमूरकरांना लागता१६ ऑगस्टच्या सायंकाळी ७.०० वाजता चिमूर मधील बालाजी मंदिराजवळ त्यांनी सभा घेतली. त्यात ब्रिटिश लष्कर लवकर व सहजासहजी चिमूर मध्ये प्रवेश करू नये म्हणून एक रणनिती आखण्यात आली. त्यात ब्रिटिश लष्कर चंद्रपूर व्हाया वरोरा येणार म्हणून वरोरा -चिमूर रोडवरील चिमूर पासून १५ मैला पर्यंत आजूबाजूची झाडे कापून ती रस्त्यावर आडवी टाकण्यात यावी तसेच या रस्त्यावरील पुल तोडण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला. त्याप्रमाणे आंदोलनकर्त्यांनी कु-हाडी व आ-यानी झाडे तोडून रस्त्यावर आडवी टाकली व वरील रस्त्या मध्ये

पडणारा फरांडी पुल तोडला आणि रस्ता बंद केला. ऐवढच नव्हे तर चिमूरच्या आजूबाजूच्या खेडयातील लोकांना सतर्कतेचा इशारा दिला. हे कार्य आंदोलनकर्त्यांनी रात्री ९.०० वाजे पर्यंत पूर्ण केले. १७ ऑगस्टला ब्रिटिश लष्कर चिमूरला येणार या दहशतीने काही चिमूरकर घाबरले व घरदार सोडून बायको-पोरांसहित पळू लागले. तर काहि देशभक्तीने भारलेले हिम्मतवान तरूण प्रतिकाराच्या तयारीला लागले. त्यात कोरेकार, बोकारे, पोटदुखे, पोद्यार, व अन्य कॉग्रेस पुढा-यांचा समावेश होता. यांनी गावक-यांना घरी शांतपणे राहण्याचा सल्ला दिला.[१० अ.ब.क]

**ब्रिटिश लष्कराचे चिमूरला आगमण व अत्याचार आणि अटकसत्र:-**

१६ ऑगस्टच्या क्रांतीची वार्ता चंद्रपूर येथील कलेक्टर सुब्रमण्यमला कळताच त्याने घाबरून जाऊन प्रांतीय सरकारला खास लष्करी दलाची मागणी केली. त्यानूसार सरकारणे १००० ब्रिटिश सैनिक चिमूरला पाठविले. या सैन्याला चिमूरला जमिनदोस्त करण्याचा आदेश होता. वरोरा-चिमूर मार्गावरिल शेगाव पोलीस ठाण्यात ब्रिटिश लष्कर येताच त्यानी कलेक्टरला चिमूरला सोबत येण्यास सांगीतले व चिमूर येथे बंदुकीच्या गोळयाही चालविण्याचा आदेश मागीतला. पण कलेक्टरने नकार दिल्याने कलेक्टर व लष्कर यांत ताणतणाव निर्माण झाला. शेवटी काही अटींवर कलेक्टरने चिमूरला जाण्याचे मान्य केले. त्यात चिमूर मध्ये गोळया चालविण्या लायक परिस्थिती असेल तरच गोळया चालविल्या जातील अन्यथा नाही. तुमचे सहकार्य मला चिमूर मध्ये शांती प्रस्तापित करण्याकरिता पाहिजे आहे. त्यावर लष्कराने कलेक्टरचे म्हणणे मान्य केले.[११ अ.ब]त्यानंतर कलेक्टर लष्करानिशी चिमूरला आले व परिस्थितीचे अवलोकन करून गोळया न चालविण्याचा लष्कराला आदेश दिला. परिणामी चिमूर वरील एक मोठे संकट टळले असले तरी लोकांना अटक करण्याचा लष्कराला आदेश दिल्याने चिमूर मधील ३०० लोकाना अटक करण्यात आली. त्यांना कलेक्टरने लष्कराच्या मदतीने १५ फुट रूंद व २० फुट लांब अशा बिगर छताच्या गुरांच्या कोंडवाडयात बंद केले. या ठिकाणी त्याचे लघूशंकेस व शौचास जाने तसेच खाणे-पीने सर्व काही बंद केले. त्यांच्यावर चौफेर पोलीसांचा खडा पहारा होता. आंदोलणकर्त्यांनी पिण्यास पाणी मागीतले तर कोंडवाडयातील गुरांच्या टाक्याकडे लष्कर व पोलीस बोट दाखवित होते. एकंदरित अटक केलेल्या लोकांची अवस्था मरणप्राय झालेली होती.[१२ अ.ब.क.]

उपरोक्त कृतीनंतर ब्रिटिश सरकारने चिमूरकरांवर अत्याचार करण्यास सुरवात केली. सर्वप्रथम ब्रिटिश लष्करातील सैनिक घरात प्रवेश करित आणि पुरूष व स्त्रियांना पकडून पोलीस स्टेशन मध्ये बंद करित तसेच काही ठिकाणी पुरूष नाहीत या संधीचा फायदा घेऊन अनेक सैनिकांनी चिमूर मधील स्त्रियांवर अमाणवीय अत्याचार व बलत्कार केले. त्यात सैनिकांच्या नजरेतून तरूणताठया मुली, कही दिवसातच बाळंतीन होणा-या गर्भवती स्त्रिया व वृध्द स्त्रिया देखील सुटल्या नाहित.[१३]

**ब्रिटिश लष्कराने चिमूरची केलेली लूट:-**

१९ ऑगस्टला कलेक्टरच्या आदेशाने सैनिकांना घरात जी व्यक्ती सापडेल त्याला केनने बेदम मारत-मारत फरफटत ओढण्यात आणल्या जाई व त्याना अटक करण्यात येत होती. या दरम्यान १२० लोकांना अटक करण्यात आली. तसेच लोकांच्या घरातील कपाटे, कोठया, फोडली त्यातील सोने-नाणे व जडजवाहिरलुटले आणि देवघरांची दुर्दशा केली. हि ब्रिटिश सरकारची नादिरशाही दोन दिवस अहोरात्र सुरू होती. पण या अत्याचाराची माहिती बाहय जगाला कळू नये याची कलेक्टरने पूर्ण खबरदारी घेतली होती.[१४.अ.ब.क.]

**चिमूरच्या स्त्रियांचे कार्य:-**

ब्रिटिश सरकारच्या दहशतीमुळे त्यांच्या सैन्याच्या अत्याचाराची व बलत्कारांची माहिती जिल्हाधिका-याला होत नव्हती म्हणून चिमूर मधील ७५ वर्षिय हिम्मतवान लक्ष्मीबाई उर्फ दादीबाई बेगडे या महिलेने आपल्या गीताबाई नाईक, राधाबाई भोपे, मंदाकिनी भोपे, रूक्मिनी नाईक, भागीरथी राचेलवार व सुंदरा नेवूलकर या मैत्रीनीसह सैनिकांच्या बंदुकांना व पोलीसांच्या धमकावण्याना न घाबरता हुशारीने जिल्हाधिका-याकडे पोहचल्या आणि घडलेला अत्याचार व बलात्काराचा प्रकार सांगीतला. तेंव्हा जिल्हाधिका-याने स्वत: पाहणी करूण लष्करावर दबाव आणून 'यह नराधामी बंद करो' असा आदेश दिला. यासात दिवसाच्या काळात ब्रिटिश लष्कराने चिमूरवासियांनाजर्जर करूण सोडले.[१५]या अत्याचाराच्या दरम्यान दादीबाई बेगडेंनी चिमूर मधील आश्रयासाठी आलेल्या ५० महिलांना स्वत: च्या वाडयात आश्रय दिला. तसेच त्यांच्याजवळ असलेले सोन्या-चांदीची दागीने एका पातळात बांधून घरच्या विहीरित टाकले आणि त्यावर टीन व टाकाऊ सामान ठेवले आणि महिलांच्या अब्रुचे तसेच मालमत्तेचे संरक्षण केले.[१६] त्याचप्रमाणे चिमूर मधील शासकीय मुलींच्या शाळेच्या मुख्याध्यापीका प्रभावती घरोटे यांनी आपल्या शासकीय कर्मचारी निवासा मध्ये २५ महिलांना आश्रय दिला व महंमद गजनी सारखे वागणा-या ब्रिटिश लष्करा पासून वाचविले.[१७]चिमूरला ब्रिटिश लष्कर आल्यापासून चिमूरचा शेजारच्या गावांशी संपर्क तुटला. लष्कराच्या कडक बंदोबस्तामुळे कोणतीच मदत चिमूरकरांना करता येत नव्हती. अशा परिस्थितीत नालवाडी आश्रमाचे गोपाळराव वांजूळकर यांनी चिमूर मधील अत्याचाराची माहिती मिळविली व ती नागपूरच्या कार्यकर्त्यांना कळवून बाहय जगाचे लक्ष चिमूरकडे केंद्रित केले.[१८]

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाना कारावास:-**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी भजनातून वर्धा व चांदा जिल्हयातील क्रांतीच्या ज्वाला भडकविण्याचे कार्य केले तसेच खरे क्रांतीचे जनक तेच आहेत असा गुप्त अहवाल ब्रिटिश सरकारला प्राप्त होताच त्यांनी महाराजाना २८ ऑगस्टला चंद्रपूर येथील बाबूपेठला २६(१) डी. आय. आर. लागू करून अटक केली तेंव्हा महाराजांनी त्याचे स्वागत केले. [१९]अटकेनंतर महाराजाना २ ते ३ दिवस नागपूला व नंतर रायपूरला जेल मध्ये ठेवले. तेथे त्यांनी कैदयाची सेवा व चरखा चालविण्याचे पुर्वव्रत कार्य सुरू ठेवले.[२०]

**चिमूर क्रांतीची चौकशी:-**

चिमूर क्रांतीची माहिती बाहय नारी जगताला कळू नये म्हणून बाहेरील स्त्रियांना चिमूरला जाण्यास बंदी होती. पण पुढे बाहेरिल स्त्रियांना चौकशी अधिका-यां बरोबर चिमूरला जाण्याची व तेथील स्त्रियांची चौकशी करण्याची परवानगी मिळताच नागपूरातील सौ. विमलाताई देशपांडे, सौ. द्वारकाबाई देऊसकर, सौ. विमलाबाई अभ्यंकर, सौ. रमाबाई तांबे, आणि डॉ. दुर्गाताई वझलवार या भगिनी चिमूरला पोहचल्या तर वर्ध्यावरून वांजूळकर चिमूरला पोहचल्या त्यांनी चिमूर मधील चांभारपूरा, तेलीपूरा व बालाजीपूरा या ब्रिटिश अत्याचाराला बळी पडलेल्या मोहल्ल्यांनाभेटी दिल्या. डॉ.वझलवार यांनी काही बलात्कारी स्त्रियांची तपासणी केली, काही स्त्रियांच्या मुलाखती घेतल्या वैद्येकीय तपासाअंती एका पाच दिवसीय बाळंतीनवर बलात्कार केल्याचे सिध्द झाले.[२१] चिमूरला आलेल्या वरील भगिनीनी अत्याचार व बलात्कार झालेल्या मुली, गर्भवती स्त्राया, वयस्क स्त्रियांच्या जबानी व मुलाखती घेतल्या त्यातही अनेक स्त्रियांवर बलात्कार झाल्याचे निदर्शनास आले. डॉ.मुंजे व नागपूरच्या भगिनींनी चिमूर प्रकरणावर प्रकाश टाकल्याने वडॉ. मुंजेनी चिमूर प्रकरणवर चौकशी

समिती नेमण्याची मागणी केल्याने सरकारला तोंड उघडने भाग पडले.[२२]

**प्राध्यापक भंसाळीचे उपोषण:–**

प्राध्यापक भंसाळी यांनी चिमूर व आष्टी मधील अत्याचाराला न्याय मिळवून देण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले. चिमूर व आष्टीची शोकांतीका व सत्ताधा–यांचा निषेध म्हणून त्यांनी ११ नोव्हेंबर १९४२ रोजी आमरण उपोषणाला सुरूवात केली. व तीनदा चिमरूला पायी जाण्याचा प्रयत्न केला तेंव्हा त्यांना वर्ध्या बाहेर जाण्यास सरकारने बंदी घातली.[२३] शेवटी ६ जानेवारी १९४३ रोजी सौ. अनसूयाबाई काळे यांच्या आग्रहावरून डॉ.खरे यानी उपोषण स्थळी भेट देऊन भंसाळींची प्रकृती तपासली [२४] भंसाळींची प्रकृती अतिसय बिघडलेली पाहून डॉ. खरे यानी गव्हर्नर सर हेन्री ट्रायनॅमची भेट घेऊन त्याचे मन वळविले. त्यानंतर गव्हर्नरने असे आश्वासन दिले की, महिलांची प्रतिष्ठा व त्यांच्यावर होणारे हल्ले यासाठी सरकार एक आदेश काढेल .त्यात चिमूर व आष्टीच्या बातम्यां वरील सर्व शासकीय बंधने मागे घेण्यात येतील त्यानंतर प्रा. भंसाळीनी १२ जानेवारी १९४३ रोजी ६३ व्या दिवशी आमरण उपोषण सोडले.[२५]

**चिमूर प्रकरणातील कोर्टकचे–या व शिक्षा:–**

१६ ऑगस्ट १९४२ रोजी चिमूर मधील क्रांतीकारकांनी जे कार्य केले त्या संदर्भात ब्रिटिश सरकारने त्यांना तुरूंगात डांबण्याचा सपाटा सरू केला . त्यांच्यावर विविध प्रकारचे खटले भरले. त्यामध्ये एस.डीओ.डूंगाजी व नायब तहसिलदार सोनवणे यांचा खून, डागबंगला जाळणे, फरांडी पुल तोडणे, पटवारी रेकार्ड जाळणे, माध्यमिक शाळा जाळणे इ. चा समावेश होता.[२६]वरील खटले सरकार मार्फत चालविण्याची जबाबदारी न्यायाधीश टि. डी. विकेन्डन यांच्याकडे देण्यात आली त्यांना मदतीसाठी न्यायमुर्ती डब्ल्यू खान व बी. बी. वैद्ये होते. तर क्रांतीकारकांची.बाजू के. एम. मुन्शी यांनी मांडली त्यांना चंद्रपूरचे बळवंराव देशमूखांचे सहकार्य होते. पण ब्रिटिश सरकारच्या न्यायालयीन अधिका–यानी चिमूरकरांच्या तक्रारी फेटाळून लावल्या न्यायमुर्ती विकेन्डनने चिमूरच्या २१ क्रांतीवीरांना फाशी, २८ क्रांतीवीरांना जन्मठेपेची, ३५ क्रांतीवीरांना ५ वषपिक्षा अधिक सश्रम कारावासाची शिक्षातर १३८ क्रांतीवीरांना ५ वर्षा पेक्षा कमी कालावधीच्या सक्षम कारावासाच्या व स्थानबद्धतेच्या शिक्षा ठोठावल्या.[२७] व त्याना नागपूर, अकोला आणि जबलपूर तुरूंगात रवाना केले.[२८] तसेच चिमूरकरांवर १ लाख रूपये आर्थिक दंड सुध्दा लावण्यात आला.[२९]

**हायकोर्टात अपील:–**

चिमूरकरांवरील खटला संपताच न्यायमुर्ती विकेन्डेनच विशेष न्यायालय विसर्जित करण्यात आले. ज्या क्रांतीवीरांना फाशीची शिक्षा झाली होती, त्यांच्या वतीने अॅड. केदार व त्यांच्या सहका–यानी हायकोर्टात अपील केली. त्यादरम्यान नागपूर हायकोर्टाचे वकील मि. ग्रील कोते.[३०]

**फाशी निवारन समितीचे गठन व कार्य:–**

चिमूर– आष्टी प्रकरणात फाशी झालेल्या क्रांतीवीरांना सहकार्य करण्यासाठी डॉ. खरे यांच्या अध्यक्षतेखाली फाशी निवारण समिती गठीत करण्यात आली. या समितीचे अध्यक्ष स्थान सौ. अनसूयाबाई काळे होत्या तर समितीत मा.ग. चिटनिस, गणपतराव बुटि, समीउल्लखान, युसूफ शरिफ, डॉ. चोळकर, बाबूराव हरकरे व. गोपाळराव वाळूंजकर यांचा समावेश होता.[३१] १९४२ च्या आंदोलनात फाशीची शिक्षा झालेल्यांची संख्या – बैतूल – १, आष्टी १० चिमूर १३ एकूण २४ लोंकाची फाशीच्या शिक्षेमधून मुक्तता व्हावी म्हणून या समितीने आकाश पाताळ एक केले.[३२]पण वरील फाशी झालेल्या क्रांतीविरांचा खटला कोर्टात चालविण्यासाठी खर्च येणार होता. त्याकरिता ६६७१२ रुपयांचा निधी गोळा करण्यात आला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी देखील भजनातून एक पैशा पासून १० पैशा पर्यंत निधी गोळा करुन फाशी निवारण समितीला दिला.[३३] त्यानंतर फाशी निवारण समितीने कोर्टात केस चालवून १५ एप्रिल १९४४ ला ४ सेनानिंची फाशीची शिक्षा रद्द करविली. हा खटला लढविण्याचे प्रयत्न ॲड. डॉ. केदार व श्री. घाटे वकीलांनी केले. उर्वरित लोंकाची शिक्षा न्यायलयाव्दारे माफ होण्याची आशा मावळली तेव्हा ६०० सेवाभावी संस्था व दोन लाख लोकांच्या दयेच्या अर्जाचा प्रयोग करण्यात आला. तेव्हा कुठे लोंकाच्या आग्रहा मूळे १९ जानेवारी १९४५ रोजी गव्हर्नर ने ४ सेनांनीची फाशी रद्द केली.[३४]

महात्मा गांधी यांनी चिमूर – आष्टीयेथील सप्तचिरंजिवांचीफाशींची शिक्षा रद्द करण्यासाठी ३ फेब्रूवारी १९४५ रोजी मध्यवर्ती शिक्षा मुक्तता समितीचे सचिव श्री. एन.एस. हरकरे यांना भेटून आपल्या अधिकारांचा वापर करुन फाशीची शिक्षा रद्द करावी अशी विनंती केली.[३५]शेवटी उरलेल्या दोन सेनानी साठी (चिमूरचे ५)अनसूयाबाई काळे, डॉ. खरे, डॉ. राजेंद्र प्रसाद व महात्मा गांधीजीने केलेल्या प्रयत्नांना १६ ऑगष्ट १९४५ रोजी व्हाईसरॉयने फाशीची शिक्षा रद्द केली. एकंदरीत ३ वर्षानंतर हा न्याय मिळाला. त्यामुळे चिमूर व पर्यायाने संपूर्ण चंद्रपूर जिल्यातील जनता आनंद विभोर झाली.[३६]

**संदर्भ :–**

पाठक दमयंती – वैदर्भिय महिलांचे स्वातंत्र्य संग्रामातील योगदान मंगेश प्रकाशन नागपूर– २००३ पृष्ट १७५

Chudhari K.K. - Quit India Revoluation the Routs of its Central Direction - Popular Prakashan Mumbai 1996 - P.74-75

काटकर तु.ना. व गुप्त रमेश–चंद्रपूरचा सिंह–नवजीवन प्रकाशन,चंद्रपूर १९७१पृ. ६४

Chudhari K.K. - P.77-78

आझाद मौलाना अबूल कलाम (अनुवादक–शांता भांडारकर) स्वातंत्र्याच्या जन्मकाली (इंडीया विनस फ्रिडम) ओरिएंटल लॉगमन्स लि. कलकत्ता–१९६१ पृ.८३–८४

Chudhari K.K. - P. 311

Chopra P. N. - Quit India Movement - Govt. of India, New Delhi 2nd Edh -1992 P. 48

मंगळवेढेकर राजा – अखेरची झुंज – अरूण पारगांवकर, सदाशिव पेठ पुणे – ४५–१९९२ पृ. १४२ – ४५

अ. कुलकर्णी राजाभाऊ – जळते दिवे पेटलेली माणसे –गोपाळ मोकाशी

सदाशिव बागाईकर स्मृती माला सदाशिव पेठ पुणे – १९८६ पृ. १४०

ब. मिश्र पंडित भगवतीप्रसाद –भारतीय स्वतंत्र संग्राम में चंद्रपूर –रमा

प्रकाशन चंद्रपूर – १९८६ पृ. १४०

क. प्रा. कडवे रघूनाथ – १९४२ चा चिमूर क्रांती संग्राम – अमर प्रकाशन

नागपूर – २००२ पृ. ४२ – ४५

अ. चंद्रपूर जिल्हा अभिलेखागार – चिमूर फाईल

ब. प्रा. कडवे रघूनाथ – १९४२ चा चिमूर क्रांती संग्राम – पृ.४६

क. काटकर तु. ना. –चिमूरचा स्वतंत्र संग्राम –शारदा प्रकाशन चांदा –

१९५४ पृ. ३२

अ. मिश्र पंडित भगवतीप्रसाद – पृ. २६०–२६१

ब. प्रा. कडवे रघूनाथ – १९४२ चा चिमूर क्रांती संग्राम – पृ.४८ –४९

अ. Chopra P. N. - P. 50
ब.मिश्र पंडित भगवतीप्रसाद – पृ. २६१
क. काटकर तु. ना. –चिमूरचा स्वतंत्र संग्राम – पृ. ३६ कित्ता
अ. Chopra P. N. - P. 50
ब. प्रा. कडवे रघूनाथ – १९४२ चा चिमूर क्रांती संग्राम – ५३
प्रा. कडवे रघूनाथ – १९४२ चा चिमूर क्रांती संग्राम – ५३
पाठक दमयंती – पृ. २००कित्ता
काळे पु. ब. –अनसुयाबाई आणि मी –पु. ब. काळे, नागपूर १९६२ पृ. १९६
अ.प्रा. कडवे रघूनाथ – १९४२ चा चिमूर क्रांती संग्राम – पृ. ५८
ब.मांडवकर डॉ. भाऊ – राष्ट्रसंत आणि स्वातंत्र्याची चळवळ –संस्कार प्रकाशन नागपूर, १९९७ पृ. ७४–७५
अ.प्रा. कडवे रघूनाथ –मानवतेचे पुजारी तुकडोजी महाराज, संस्कार
प्रकाशन नागपूर, १९९४ पृ. ६८
ब.मांडवकर डॉ. भाऊ – पृ.७७
क. मिश्र पंडित भगवतीप्रसाद – पृ. २६२
काळे पु. ब. – पृ. १९६–१९७
कित्ता
कोलारकर डॉ. श. गो.– लोकमत १३ ऑक्टोंबर २००२ पृ. ४ कित्ता
काळे पु. ब. – पृ. २००
कोलारकर डॉ. श. गो.– लोकमत १३ ऑक्टोंबर २००२ पृ. ४
चंद्रपूर जिल्हाअभिलेखागार ( चिमू फाईल)
प्रा. कडवे रघूनाथ – १९४२ चा चिमूर क्रांती संग्राम – पृ. ६१–६२
प्रा. कडवे रघूनाथ – १९४२ चा चिमूर क्रांती संग्राम – पृ. ६४
लोकमत, १५ ऑगस्ट १९८४
प्रा. कडवे रघूनाथ – १९४२ चा चिमूर क्रांती संग्राम – पृ. ६५
कोलारकर डॉ. श. गो.– आधुनिक विदर्भाचा इतिहास –मंगेश प्रकाशन,
नागपूर,२००३ पृ. २३१
कित्ता – पृ. २३२
अ.मांडवकर डॉ. भाऊ – पृ.७७
ब. प्रा. कडवे रघूनाथ – १९४२ चा चिमूर क्रांती संग्राम, पृ. ८३–८४
कोलारकर डॉ. श. गो.– पृ. २३२
काटकर तु. ना. –चिमूरचा स्वातंत्र संग्राम – पृ. ४०